# ६ सामाजीकरण

६.१ सामाजीकरण : अर्थ आणि व्याख्या
६.२ सामाजीकरणाची प्रक्रिया
६.३ सामाजीकरणाची साधने
६.४ पुनर्सामाजीकरण

## प्रस्तावना

प्रामाणिक लाकूडतोड्याच्या गोष्टीमध्ये त्याला देवदूताकडून त्याच्या लोखंडी कुऱ्हाडीबरोबरच सोन्याची आणि चांदीचीही कुऱ्हाड प्रामाणिकपणाचे बक्षीस म्हणून मिळते. या गोष्टीमधून मुलांना प्रामाणिकपणाचे महत्त्व प्रभावीपणे समजते. अशा दंतकथा आणि गोष्टींमधून मुलांना मोठ्यांकडून खूप काही शिकायला मिळत असे. सध्याच्या काळात त्याची जागा ॲनिमेटेड फिल्म्स किंवा रंगीबेरंगी आकर्षक पुस्तकांनी घेतली आहे. माध्यमांचे स्वरूप जरी बदलले तरी या गोष्टी पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित होत राहिल्या.

प्रत्येक समाजात या गोष्टींचा हेतू हा लहान मुलांना चूक/बरोबर, मान्य/अमान्य, योग्य/अयोग्य याबाबतची जाणीव करून देणे हाच असतो. मुलांना स्व ची जाणीव होणे किंवा कौशल्य आत्मसात करण्याची जी प्रक्रिया असते त्याला सामाजीकरण असे म्हटले जाते.

सामाजीकरणाचा अर्थ व प्रक्रिया समजून घेणे हा या पाठाचा उद्देश आहे. या पाठात व्यक्तीचे सक्षम, कृतीशील, सामाजिक व्यक्तीमध्ये रूपांतरण कसे होते ते समजून घेऊ या.

## ६.१ सामाजीकरण: अर्थ आणि व्याख्या

### ६.१.१ सामाजीकरणाचा अर्थ

मानवी वर्तनाचा अर्थ हा जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून लावला जावा की, सांस्कृतिक, सामाजिक दृष्टिकोनातून हा समाजशास्त्रीय चर्चेचा विषय ठरतो. अनुवंशशास्त्र किंवा जीवशास्त्र असे मानते की, व्यक्ती जन्माला येताना त्यांच्यात काही कौशल्ये किंवा जन्मजात प्रवृत्ती या आनुवंशिकतेने येतात. सहज वृत्ती किंवा उपजत वृत्ती या मानवी वर्तन ठरवण्यात महत्त्वाच्या असतात. या दृष्टिकोनानुसार माणूस काही उपजत प्रवृत्ती घेऊन जन्माला येतो असे मानले जाते. प्रत्यक्षात मात्र सामाजीकरणाची प्रक्रिया मानवी जीवनातील संगोपनाची भूमिका अधोरेखित करते. जीवनात व्यक्तीला येणाऱ्या विविध सामाजिक अनुभवांतून ती सामाजिक होत जाते. या प्रक्रियेला 'सामाजीकरण' असे म्हणतात.

**आनुवंशिकशास्त्र :** आनुवंशिकशास्त्र म्हणजे गुणसूत्रे व आनुवंशिकतेचा अभ्यास होय. पालकांकडून आपल्या मुलांकडे आनुवंशिकतेतून आलेल्या वर्तन पद्धतींचा अभ्यास आनुवंशिकशास्त्रामध्ये केला जातो.

### ६.१.२ व्याख्या

१) ***वॉलेस आणि वॉलेस :*** "व्यक्तीमध्ये समाजमान्य मूल्ये आणि वर्तन पद्धती रुजवण्याच्या आणि व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व आणि स्वः चा विकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेला सामाजीकरण असे म्हणतात."

२) ***हॉर्टन आणि हंट :*** "सामाजीकरण ही अशी प्रक्रिया आहे ज्यात व्यक्ती समाजाच्या मापदंडानुसार स्वतःला घडवते. समाजाच्या परंपरा अंगीकारून सामाजिक परिस्थितीशी जुळवून घेते."

३) ***हॉब्ज आणि ब्लँक :*** "एका जीवशास्त्रीय प्राण्याचे सामाजिक प्राण्यात रूपांतर करणे म्हणजे सामाजीकरण होय."

वरील व्याख्यांवरून सामाजीकरण म्हणजे –

i. **एखाद्या संस्कृतीत सर्वमान्य असलेल्या वर्तन पद्धती शिकण्याची प्रक्रिया :** लहान मुलांना समाजातील जबाबदार घटक होण्यासाठी समाजातील भूमिका, मूल्ये, नियमने यांचे ज्ञान होणे आवश्यक असते. सामाजीकरणातून व्यक्ती आपल्या वडीलधाऱ्यांचे विचार, सांस्कृतिक मूल्ये आणि सामाजिक कार्यपद्धती अंगीकारते. यामुळे सामाजीकरण हे समाजातील विविध पिढ्यांना एकमेकांशी बांधून ठेवते.

ii. **जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत चालणारी प्रक्रिया आहे :** अपत्यजन्म हा पती–पत्नीसाठी एक खास अनुभव असतो. वृद्धांना आजी किंवा आजोबा या वेगळ्या नात्यातून पुढच्या पिढीशी जोडले जात असते.

iii. **व्यक्ती समाजाचा सदस्य बनते :** प्रत्येक समाजाची स्वतंत्र अशी जगण्याची एक सामुदायिक जीवनपद्धती, संस्कृती असते. ही सामुदायिक जीवनपद्धती शिकण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजीकरण होय.

समाजापासून दुरावलेल्या मुलांच्या काही घटनांमधून हे स्पष्ट होते की, सामाजीकरण ही एक शिकण्याची प्रक्रिया आहे.

तुमच्यापैकी अनेकांनी ज्याला कोल्ह्याने वाढवले त्या मोगलीची गोष्ट आनंद घेत ऐकली असेल किंवा १९२० मध्ये घडलेली सत्य घटनाही माहिती असेल. मिदनापूर मध्ये दोन लहान मुली कोल्ह्याच्या गुहेत सापडल्या. त्या कोल्ह्यांप्रमाणे ओरडत होत्या, कच्चे मांस खात होत्या, दोन पायांवर सरळ चालत नव्हत्या व अनेक मानवी कौशल्यांपासून अनभिज्ञ होत्या.

मूलभूत सामाजिक आणि शारीरिक विकासासाठी मानवी संपर्क आवश्यक असतो असे जेनीसारख्या घटना आणि गोष्टींमधून आपल्या लक्षात येते. उदा., सामान्य कौशल्ये जसे सरळ उभे राहणे, चालणे, भाषा वापरणे जे सर्वसामान्य मुलांकडून अपेक्षित असते. तेही जेनीला जमत नव्हते. अशा उदाहरणांमधून सामाजीकरणाचे महत्त्व स्पष्ट होते.

**हे तुम्हांला माहीत आहे का?**

एक जेनी नावाच्या मुलीचे उदाहरण आपल्याला सामाजीकरणाचे महत्त्व पटवून देते. १९७० मध्ये कॉलिफोर्निया मध्ये एक १३ वर्षाची असामाजिक परिस्थितीतील मुलगी आढळली. ती एका खोलीत बंद होती. पालकांनी जन्मापासून कोणाशीही तिचा संपर्क येऊ दिलेला नव्हता. ती कुपोषित, दुर्लक्षित, प्रेमाला भुकेली, खेळणी किंवा समवयस्कांपासून दूर अशा अवस्थेत होती. ती जेव्हा सापडली तेव्हा सरळ उभी पण राहू शकत नव्हती, बोलू शकत नव्हती ती फक्त रडू शकत होती.

विविध गोष्टी करण्याचे विविध मार्ग प्रत्येक संस्कृतीत विकसित होत असतात. त्यामुळे सामाजीकरणाचे महत्त्व अजूनच वाढते. जर मानवी वर्तन हे केवळ उपजत प्रवृत्तींवर आधारित असते तर विविध समाजांमधील मानवी वर्तनातील फरक खूप कमी प्रमाणात दिसला असता. तसेच वेगवेगळ्या ठिकाणांचे आणि वेगवेगळ्या काळांतले मानवी वर्तन साधारणपणे सारखेच दिसले असते. सांस्कृतिक भिन्नतेपेक्षाही मानवाची विचार प्रक्रिया आणि वर्तन हे व्यापक संस्कृतीवर अवलंबून असते. ती संस्कृती माणसाला वारशाने मिळत असते व ती तो जगत असतो. आजच्या बहुविध अशा समाजात सामाजीकरणाची प्रक्रिया समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण त्यातून हे स्पष्ट होते की, प्रत्येक व्यक्तीची जीवनपद्धती ही अनेक गोष्टींतून तिने स्वतः आत्मसात केलेली आहे.

## ६.२ सामाजीकरणाची प्रक्रिया

मानवी वर्तन आणि कौशल्ये ही शिकावी आणि शिकवावी लागतात. ही शिकण्याची प्रक्रिया जिला सामाजीकरण म्हटले जाते. ती व्यक्तीचा एक व्यक्तिगत स्व ते सामाजिक स्व हा प्रवास घडवून आणते. सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून व्यक्ती वर्तनाचे नियम शिकून समाजाची एक जबाबदार घटक बनते.



जॉर्ज हर्बट मीड

**जॉर्ज हर्बट मीड :** यांनी सामाजिक "स्व" बांधणीची प्रक्रिया सविस्तर स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, 'स्व' ची निर्मिती ही जन्मतः नसते. जन्मानंतर इतरांशी होणाऱ्या आंतरक्रिया आणि संपर्कातून 'स्व' ची निर्मिती होते व त्यातूनच एक सामाजिक मनुष्य निर्माण होतो.

मीडच्या मते 'स्व' ची निर्मिती ही तीन महत्त्वाच्या अवस्थांमधून होते.

**(१)अनुकरण :** या अवस्थेत मुले मोठ्यांच्या वर्तनाचे फक्त अनुकरण करत असतात. एखादे लहान मूल त्याच्या आईला त्याच्या खेळातल्या गाडीतून ऑफिसला सोडू शकते किंवा त्याच्या पालकांना हातात झाडू किंवा नुसती काठी घेऊन फरशी साफ करायला मदत करू शकते.

**(२)प्ले स्टेज :** काही वेळा लहान मुले खेळताना आई, बाबा, शिक्षक, पोस्टमन, पोलिस बनतात. या अवस्थेत प्रतिसाद निश्चित नसतात. लहान मूल त्याला महत्त्वाच्या वाटणाऱ्या भूमिकांमध्ये स्वतःला बसवून त्या समजावून घेण्याचा प्रयत्न करत असते. प्रथम मूल स्वतः व इतरांमध्ये फरक करू शकत नाही. पण जसजसे ते इतर व्यक्तींच्या संपर्कात येऊ लागते तसतसे त्याला स्वतःच्या 'मी' पणाची जाणीव होते. Significant Others ही संकल्पना मीड ने अशा इतर व्यक्तींसाठी वापरली ज्या 'स्व' च्या विकासात महत्त्वाच्या असतात. त्या व्यक्तीच्या विचारांवर प्रभाव पाडतात. त्यांची मते व्यक्तीसाठी महत्त्वाची असतात. अशा व्यक्ती म्हणजे पालक, भावंडे, मित्र किंवा शिक्षक यांच्यापैकी कोणीही असू शकते.

**(३)गेम स्टेज :** मूल जसे मोठे होत जाते व त्याचा 'स्व' विकसित होत जातो. तसे ते इतरांच्या अपेक्षांप्रमाणे वर्तन करायला शिकते. इतरांचा प्रभाव व विविध परिस्थिती जाणून ते वर्तन करू लागते. विविध हेतूंसाठी विविध व्यक्तींच्या आंतरक्रिया ते जाणून घेऊ लागते. प्रत्येक भूमिकेला प्रत्येक परिस्थितीत काही नियम अपेक्षा यानुसारच वर्तन करावे लागते हे त्यांना समजते. उदा., एखाद्या उपाहारगृहात सर्व कामे सुरळीत पार पाडण्यासाठी अनेकांना वेगवेगळ्या जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. हे त्याला समजू लागते. (कोणीतरी तुम्हांला बसवते, दुसरे कोणीतरी ऑर्डर घेते, कोणीतरी जेवण बनवते, कोणीतरी जेवणानंतर टेबल स्वच्छ करते.) त्यानंतर इतरांना अपेक्षित असलेली भूमिका स्वीकारण्याची क्षमता विकसित होऊ लागते. थोडक्यात इतरांसोबतच्या आपल्या प्रतिकात्मक आंतरक्रियांमधूनच 'स्व' ची निर्मिती होत असते.

या दृष्टीने स्व-जाणीव निर्माण होण्याची प्रक्रिया म्हणजे सामाजीकरण होय. सामाजिक नियम आणि पद्धतीप्रमाणे वर्तन शिकण्याची प्रक्रिया होय. शेकोटीने हाताला चटका बसतो, तेव्हाचे आपले वर्तन लक्षात घ्या. वेदनेला दिला जाणारा प्रतिसाद ही सहज प्रवृत्ती असते. पण त्यानंतर होणारे वर्तन हे तुम्ही समाजात कोण आहात यावर ठरते. (स्त्री/

पुरुष, लहान/मोठे) किंवा कुठे आहात (घरात/बाहेर) यावर ठरते.

सामाजीकरण ही शिकण्याची प्रक्रिया असली आणि लहान वयात ती जास्त महत्त्वाची असली तरी ती संपूर्ण आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. लहान वयात होणाऱ्या शिक्षणाला प्राथमिक सामाजीकरण असे म्हणतात. मूल समाजातील मूल्ये, प्रमाणके, नियमने यांच्या संपर्कात येते. ही सर्व मूल्ये, नियमने, प्रमाणके, दृष्टिकोन शिकून समाजातील विविध समूहांचा सदस्य बनण्याची (कुटुंब, नातेवाईक, समवयस्क इ. त्यानंतर शाळा, व्यावसायिक गट) ही प्रक्रिया आयुष्यभर चालते. नंतर आयुष्यभर चालणाऱ्या प्रक्रियेला दुय्यम सामाजीकरण म्हटले जाते.

## ६.३ सामाजीकरणाची साधने/माध्यमे

लहान मूल हे वेगवेगळ्या सामाजिक समूहांत आणि आंतरक्रियांमध्ये सहभागी होऊन हळूहळू समाजाचा सदस्य बनते. अगदी नवजात अर्भकही या प्रक्रियेचा कुटुंबाचा एक भाग बनते. परंतु सामाजीकरणाचे कुटुंब हे एकमेव माध्यम नाही. विविध सामाजिक समूह आणि सामाजिक संदर्भ ही सामाजीकरणाची साधने असू शकतात.

### ६.३.१ कुटुंब :

प्राथमिक सामाजीकरण हे अगदी लहान वयात होते. या अवस्थेत कुटुंब हे सामाजीकरणाचे मुख्य साधन असते. यात मूल, भाषा आणि मूलभूत वर्तन पद्धती शिकते. मूलभूत मूल्ये, वर्तन पद्धती आणि भविष्यातील शिक्षणासाठी आवश्यक असणारे दृष्टिकोन कुटुंबात शिकायला मिळतात. कुटुंबात विविध भूमिका समजतात. काही जबाबदाऱ्या आणि कर्तव्यांचे ज्ञान मुलाला पालक आणि इतर कुटुंबीयांकडून होते. हे प्रामुख्यांनी अनौपचारिक स्वरूपाचे शिक्षण असते. प्रामुख्याने ते सकारात्मक आणि नकारात्मक स्वरूपाचे असते. सकारात्मक आणि नकारात्मक मान्यता देऊन मान्य आणि अमान्य वर्तन पद्धती मुलांमध्ये रुजवल्या जातात. सकारात्मक मान्यतेमध्ये शारीरिक हावभाव (उदा., हसणे) शाब्दिक मान्यता (चांगला मुलगा/मुलगी), भौतिक पारितोषिक (वस्तुरूपी) आणि नकारात्मक मान्यतेमध्ये नकारात्मक प्रतिसादापासून ते शारीरिक शिक्षेपर्यंत विविध गोष्टींचा समावेश होतो. मान्य वर्तन पद्धती मुलांमध्ये विकसित करण्याचे महत्त्वाचे कार्य कुटुंब करत असते.

कुटुंबात होणारे सामाजीकरण हे खूप वेगवेगळ्या प्रकारे होत असते. कारण कुटुंबाचा एकच असा सार्वत्रिक प्रकार नसतो. संयुक्त कुटुंबात होणारे सामाजीकरण हे विभक्त कुटुंबांतील सामाजीकरणापेक्षा वेगळे असते. विभक्त कुटुंबांत फक्त पालक हे सामाजीकरणाचे हस्तक असतात, तर संयुक्त कुटुंबांत आजी-आजोबा, काका-काकू, भावंडे हेदेखील महत्त्वाची भूमिका बजावतात. काही मुले ही केवळ एक पालक असलेल्या कुटुंबांत वाढतात. तसेच विविध जाती, वर्ग आणि विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात सामाजीकरण वेगवेगळ्या पद्धतीने होत असते. विविध कुटुंबांतील सामाजीकरणाचा प्रभाव हा गरीब, वंचित कुटुंबांतील मूल आणि श्रीमंत, उच्चवर्णीय/जातीय कुटुंबांतील मूल यांच्याकडे बघून समजू शकते.

कुटुंबातील सामाजीकरण म्हणजे पालकांनी जे व जेवढे शिकवले आहे तेवढेच नाही तर मुले कधी कधी त्यालाही विरोध करू शकतात किंवा आपली वेगळी मते बनवू शकतात. आधुनिक समाजात जेव्हा विविध सामाजीकरणाची माध्यमे उपलब्ध असतात तेव्हा तर ही शक्यता खूपच वाढते.

### ६.३.२ समवयस्कांचा समूह

कुटुंबाप्रमाणेच समवयस्कांचा समूह हे देखील सामाजीकरणाचे माध्यम आहे. समवयस्कांचे समूह

म्हणजे साधारण समान वयाच्या मित्रमंडळींचे गट होत. (उदा., प्ले ग्रुप, किशोरवयीन मुलामुलींचे गट, ज्येष्ठ नागरिकांचे गट) हे गट सामाजीकरणासाठी महत्त्वाचे असतात. कारण समवयस्कांबरोबरच्या सामाजिक आंतरक्रियांचा खूप प्रभाव व्यक्तीच्या वर्तनावर पडतो. आपण कपडे कसे घालतो इथपासून ते आपल्याला काय आवडते आणि काय आवडत नाही इथपर्यंत. या गटात शाळा किंवा कुटुंबाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात समानतेचे तत्त्व आंतरक्रियांच्या बाबतीत दिसून येते.



समवयस्कांचा समूह

या गटातही अनौपचारिक स्वरूपाचे मान्यतेचे निकष असतात. एखाद्याचे दिसणे, पसंत करणे किंवा त्याने केलेल्या विनोदावर हसणे. एखाद्याला नापसंत करणे किंवा त्याचा सहवास नाकारणे असे होकारात्मक व नकारात्मक निकष दिसून येतात. भिन्न गटांत, विभिन्न परिस्थितीत समवयस्क गटातून वेगवेगळी मूल्ये शिकली जातात, परंतु मैत्रीसारखी सामाजिक मूल्ये मात्र आयुष्यभर सांभाळली जातात.

### ६.३.३ शाळा

शाळा व शिक्षण ही सामाजीकरणाची दुय्यम साधने आहेत. औपचारिक अभ्यासक्रम आणि विषय व कौशल्ये यांतून आपण शिकत असतो. रोजचा संपर्क असला तरीही इतर सदस्यांशी प्राथमिक स्वरूपाचे संबंध निर्माण होतीलच हे मात्र सांगता येत नाही. शालेय शिक्षणातून जी मूल्ये, नियमने शिकली जातात ती कुटूंबातील शिक्षणापेक्षा एक पायरी पुढची असतात. शाळेतून शिकल्या जाणाऱ्या मूल्य व भूमिकांची व्याप्ती अधिक असते. शाळेत ग्रेड, बक्षिसे, कौतुक, प्रोत्साहन देणे अशा सकारात्मक पद्धती व काही परिस्थितीत नकारात्मक पद्धतींचा अवलंब केला जातो. सांघिक भावना, स्पर्धात्मक गुण, शिस्त, अनुचलन या भावना रुजवून विद्यार्थ्याला पुढील जीवनासाठी तयार केले जाते.




शाळा

मुलांच्या शिक्षणावर परिणाम करणाऱ्या अप्रत्यक्ष अभ्यासक्रमाचा विचारही समाजशास्त्रज्ञ करतात. अप्रत्यक्ष अभ्यासक्रम म्हणजे शाळेत जाण्याच्या दैनंदिन प्रक्रियेतून आपण अप्रत्यक्षरित्या जे शिकतो ते सर्वकाही. सत्ता व अधिकारापुढे नतमस्तक होण्यापासून एकूणच व्यवस्थेचा मान राखणे हे आपण शाळेत अप्रत्यक्षरित्या शिकतो. कोणतेही प्रश्न न विचारता आहे तसा व्यवस्थेचा स्वीकार करणे हे त्यातून सूचित केले जाते. उदा., जेव्हा अभ्यासक्रमाव्यतिरिक्त काही उपक्रम घेतले जातात तेव्हा शाळा परिसर स्वच्छतेचे काम मुलांपेक्षा मुलींना दिले जाते. सध्याच्या काळात शाळांमध्ये अशा कामांत समानता आणण्याचे प्रयत्न होताना दिसतात.

### ६.३.४ प्रसार माध्यमे

आधुनिक काळातील एक अत्यंत महत्त्वाचे सामाजीकरणाचे माध्यम/साधन म्हणजे प्रसारमाध्यमे. प्रसारमाध्यमे हे आपल्या दैनंदिन जीवनाचे अविभाज्य भाग बनले आहे. एका वेळी खूप मोठ्या जनसमुदायासमोर तटस्थपणे एखादी गोष्ट मांडण्याचे

हे महत्त्वाचे साधन असते. व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडणारे संदेश, माहिती यांचे मोठ्या प्रमाणावर प्रसारण या माध्यमांद्‌वारे केले जाते. प्रसार माध्यमांमध्ये पारंपरिक छापील माध्यमे, उदा., वर्तमानपत्रे, मासिके इत्यादी तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमे, उदा. रेडिओ, दूरदर्शन, माहिती तंत्रज्ञानाने विकसित केलेली माध्यमे, समाज माध्यमे इत्यादी साधनांचा समावेश होतो. गेल्या काही दशकात एका विशिष्ट माध्यमातून लहान मुलांचे खूप वेगळ्या प्रकारे नाट्यमयरीतीने सामाजीकरण होत आहे, ते म्हणजे दूरदर्शन. काही अभ्यासांमधून असे स्पष्ट झाले आहे की, मुले शाळेपेक्षा जास्त वेळ दूरदर्शन बघण्यात घालवतात. दूरदर्शनचा प्रभाव मुलांवर खूप लहान वयापासून पडण्यास सुरुवात होते व त्याचा प्रभाव त्यांच्या बौद्‌धिक व सामाजिक विकासावर होतो.




प्रसार माध्यमे

सामाजीकरणाची साधने म्हणून प्रसारमाध्यमांच्या भूमिकेत आधुनिक तांत्रिक विकासाचा खूप परिणाम झाला आहे. तंत्रज्ञानातील बदलांमुळे प्रसारमाध्यमांचा विस्तार झाला आहे. प्रसारमाध्यमांच्या आणि सामाजिक माध्यमांच्या विविध प्रकारांमधून लोक त्यांचा खूप वेळ आभासी जगाच्या संपर्कात रहाण्यात घालवतात. पण त्याच वेळी कधी कधी कुटुंब, मित्र इत्यादी इतर सामाजीकरणाच्या साधनांपासून ते दुरावतात. दूरदर्शनवरील कार्यक्रम आणि सिनेमा हे आज व्यक्तीच्या जीवनावर मोठा प्रभाव पाडताना आपल्याला दिसतात, व्यक्ती दूरदर्शनवर काय बघतात, रेडिओवर काय ऐकतात आणि इंटरनेटवर (आंतरजाल) काय वाचतात, त्यावर अवलंबून असण्याचे त्यांचे प्रमाण आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे वाढले आहे. आज अधिकाधिक वेळ प्रसारमाध्यमांना दिला जातो व त्यातला कमाल वेळ हा करमणुकीसाठी वापरला जातो.

प्रसारमाध्यमांची झेप खूप मोठी असते व माहितीचे प्रसारण अधिक लोकशाही पद्‌धतीने करणे सहज शक्य असते. जी गावे रस्त्यांनी जोडलेली नाहीत अशा ठिकाणी electronic संपर्क होऊ शकतो. प्रसारमाध्यमांच्या अशा सुविधेमुळे माहितीचे प्रसारण, जनमत तयार करणे, मूल्य रुजवणे ही महत्त्वाची कार्ये पार पाडण्यात प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावत आहेत; पण हिंसेच्या दृश्य प्रदर्शनातून लहान मुले व युवकांवर खूप गंभीर परिणामही होत आहे. यावर अजून संशोधन होण्याची गरज आहे. प्रसार माध्यमांचा विस्तार आणि त्यांचा आशय या गोष्टी सर्वात महत्त्वाच्या आहेत.

**हे बघूया!**

**वास्तवदर्शी कार्यक्रम (Reality shows) किती वास्तविक असतात?**

भारतीय दूरदर्शनवर 'रिॲलिटी शो' ची संख्या सातत्याने वाढत आहे. त्यांच्या व्यापक परिणामांचा अभ्यास करणारे संशोधन अजूनही व्यापक स्वरूपात होत नाही. परंतु जे संशोधन झाले आहे त्यावरून हे स्पष्ट होते की, लहान मुलांवर या 'रिॲलिटी शो' चे खोल व दूरगामी परिणाम होत आहेत. हे कार्यक्रम 'दैवी गुणांचा शोध' घेतात. त्याचा आत्यंतिक परिणाम लहान मुले व पालकांवर होत असतो. 'बिग बॉस' सारखे कार्यक्रम किंवा 'रोडीज शो' सारख्या कार्यक्रमांमधून दादागिरी ही सामान्य आहे असे

दाखवले जाते. तसेच अत्यंत शिवराळ भाषाही वापरली जाते. प्रौढ प्रेक्षकांच्या लक्षात येते की, हे सर्व आधीपासूनच ठरलेले असते. पण मुलांची तेवढी परिपक्वता नसते. त्यामुळे खऱ्या आणि खोट्यातला फरक त्यांच्या लक्षात येत नाही व या कथित खऱ्याखोट्याची सरमिसळ होऊन त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होतो. काही वास्तव कार्यक्रमांमध्ये असेही दाखवले जाते की, हे स्पर्धक आपल्या जीवाची पर्वा न करता अत्यंत धोकादायक कृत्ये करत असतात. लहान मुले अनुकरणातून गोष्टी शिकत असतात. अनेकदा असे कार्यक्रम पाहून मुलेही धोकादायक कृत्ये करण्याचा प्रयत्न करतात. त्यातून त्यांच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

**उपक्रम – १**

'ब्ल्यू व्हेल' सारख्या online game च्या आव्हानांवर आणि त्यातल्या धोक्यांवर एक गटचर्चा आयोजित करा. मुले असे धोके पत्करायला का तयार होतात याची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करा. यात पालकांचा दोष आहे का आणि कायद्याची भूमिका काय असावी याचाही विचार करा.

**उपक्रम – २**

दूरदर्शनवरच्या जाहिराती किंवा संदेश बघा आणि भ्रष्टाचार, मादक द्रव्यांचे सेवन, धुम्रपान व इतर महत्त्वाच्या प्रश्नांबाबत जाणीव जागृती निर्माण करण्यात हे माध्यम किती प्रभावी ठरते आहे याचा विचार करा.

### ६.३.५ शेजारी

शेजाऱ्यांबरोबरचा संपर्क हे सामाजीकरणाचे एक महत्त्वाचे साधन आहे. गाव, शहर किंवा उपनगरात भौगोलिकदृष्ट्या एकत्र रहाणारा समुदाय म्हणजे 'शेजारी' होय. एक सामाजिक समुदाय म्हणून शेजाऱ्यांच्यात समोरासमोरचे प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होतात. कुटुंबापेक्षा मोठे असे ते स्थानिक, सामाजिक एकक असतात. या मोठ्या समुदायाचा कुटुंब हा एक भाग बनते. लहान मुले कुटुंबियांप्रमाणेच शेजाऱ्यांमध्ये रममाण होतात. शेजाऱ्यांमुळे कुटुंब या छोट्या घटकाच्या मर्यादेत न रहाता मुले मोठ्या प्रमाणावर संपर्क साधू लागतात. विस्तारीत सामाजिक संबंध निर्माण होऊ लागतात. फक्त स्वतःच्या पालकांऐवजी शेजारपाजारील इतर प्रौढ व्यक्तींचा प्रभावही लहान मुलांवर पडत असतो व त्यातून त्यांचे वर्तन, व्यक्तिमत्त्व आकार घेत असते. हे संबंध सांस्कृतिक समारंभ, खेळाच्या स्पर्धा, काही सामाजिक प्रश्न उदा., वाहतूक, पर्यावरण यातून निर्माण होत असतात व त्यातून लहान मुले खूप काही शिकत असतात.



**शेजारी**

### ६.३.६ कामाची जागा

सामाजीकरण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे. प्रौढांचे सामाजीकरण या संकल्पनेतून ही प्रक्रिया स्पष्ट होते. प्रौढांच्या सामाजीकरणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणजे कामाची जागा होय. प्रौढ व्यक्ती आपल्या जीवनातील जास्तीत जास्त काळ या ठिकाणी व्यतीत करत असते. हे सामाजीकरण म्हणजे व्यक्ती नवीन कौशल्ये, ज्ञान आणि कामाच्या दृष्टीने आवश्यक असणाऱ्या वर्तन पद्धती सतत आत्मसात करत असते. विविध व्यक्तींच्या संपर्कातून, प्रशिक्षणातून, उद्बोधन आणि औपचारीक संपर्कातून व्यक्ती नवीन भूमिका

शिकत असते. कामाच्या ठिकाणी व्यक्ती वेगवेगळ्या वयोगटांतील व वेगवेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीच्या व्यक्तींना भेटत असते. कामाच्या ठिकाणच्या आंतरक्रिया व्यक्तीला विविध क्षेत्रांतील ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत करीत असतात. चूक किंवा बरोबर या विषयीची परिमाणे बदलायला मदत करीत असतात. स्व आणि इतर यांच्यातील फरक लक्षात आणून देत असतात.

## ६.४ पुनर्सामाजीकरण

सामाजीकरण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया असल्यामुळे माणूस सतत नवीन गोष्टी शिकू शकतो. ज्ञान, कौशल्ये आणि मूल्यांच्या संदर्भात आधुनिक जग हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे. या सर्वांशी जुळवून घेण्यासाठी माणसाला जशा नवीन गोष्टी सतत शिकत रहाव्या लागतात त्याप्रमाणेच काही गोष्टी सोडून द्याव्या किंवा विसरायलाही लागतात. जुनी मूल्ये, भूमिका, वर्तन पध्दती आणि नियमने काही वेळा सोडून देण्याच्या किंवा त्याग करण्याच्या प्रक्रियेलाच 'पुनर्सामाजीकरण' असे म्हणतात.

काही वेळेला मनुष्य अशा परिस्थितीत सापडतो की त्याला जुनी जीवनपद्धती, अनुभव यापासून फारकत घेऊन नवीन पूर्णतः वेगळी जीवनपद्धती स्वीकारावी लागते. आधीची विचारपद्धती, जीवनपद्धती पूर्णतः विसरावी लागते. नवीन जीवनपद्धती ही फक्त वेगळी नसते तर आधीच्या जीवनाशी विसंगत असते. त्यामुळे व्यक्तीला सामाजिक मूल्ये, श्रद्धा, विश्वास, नियमने यांच्याबाबत खूप जागरूक रहावे लागते. पुनर्सामाजीकरणाचा पाया म्हणजे आधी शिकलेले विसरणे आणि नवीन शिकणे.

पुनर्सामाजीकरणाच्या प्रक्रियेत पुनर्सामाजीकरण करणाऱ्या सामाजिक संस्थेची मूल्ये, दृष्टिकोन, कौशल्ये व्यक्तीला नव्याने शिकवली जातात व त्या नियमांप्रमाणे व्यक्तीला या सर्व गोष्टी त्या प्रमाणात शिकाव्या लागतात. आत्मसात कराव्या लागतात. तुरुंगवास हे पुनर्सामाजीकरणाचे समर्पक उदाहरण आहे. कैदी व्यक्तीला स्वतःचे पुनर्वसन करून समाजात पुन्हा परतायचे असतेच पण तुरूंगवासात व्यक्तीला तुरुंगातील नियमांप्रमाणे नवीन जीवन स्वीकारावे लागते. त्यासाठी स्वतःच्या वर्तनात बदल घडवून आणावे लागतात. पुनर्सामाजीकरणाची तीव्रता ते कोणत्या संस्थेत होत आहे यावर अवलंबून असते. उदा., व्यक्ती जेव्हा संपूर्ण वेगळे व्यावसायिक जीवन स्वीकारते तेव्हाचे पुनर्सामाजीकरण हे सोपे असते परंतु कैद्याचे तुरुंगातील पुनर्सामाजीकरण कठीण असते. याला संस्थात्मक/ संस्थागत पुनर्सामाजीकरण म्हणतात.



तुरुंग

**अर्व्हिंग गॉफमन** यांनी संस्थात्मक ही संज्ञा प्रथम वापरात आणली. जी पुनर्सामाजीकरणाशी संबंधित आहे. या प्रक्रियेत व्यक्तीला संपूर्ण समाजापासून दूर/ अलिप्त ठेवले जाते. येथे समाजापासून दूर, कायद्यांच्या कठोर बंधनात, बंदिस्त भिंतींमध्ये व्यक्तीला ठेवले जाते. उदा. तुरुंग, मानसिक आरोग्य सुविधा. या संस्थांचा मूलभूत हेतू हा व्यक्तीचे नवीन भूमिकेसाठी पूर्णतः पुनर्सामाजीकरण करणे हा असतो. अशा ठिकाणचे पुनर्सामाजीकरण हे अत्यंत तीव्र व कठीण असते. व्यक्तीची आधीची ओळख पूर्णपणे पुसून टाकून त्या संस्थेच्या नियमांच्या चौकटीत बसणारी पूर्णपणे नवीन भूमिका त्या व्यक्तीला स्वीकारावी लागते. आपले पूर्वीचे आयुष्य, वापरातल्या वस्तू उदा., कपडे, इतर वापरातल्या गोष्टी, ऐषोआराम हे सर्व सोडून चार भिंतींच्या आतले, जीवन स्वीकारावे लागते. त्यासाठी अत्यंत प्रखर इच्छाशक्ती आणि निर्धाराची आवश्यकता असते.

थोडक्यात पुनर्सामाजीकरण म्हणजे अत्यंत खडतर मार्गावरून स्वतःच्या भूमिकेची पुर्नउभारणी करणे व सामाजिक 'स्व' ची जाणीव निर्माण होण्याची प्रक्रिया होय. बहुतेक वेळा ही एक हेतुपूर्वक आणि तीव्र स्वरूपाच्या बदलाची प्रक्रिया असते. जर एखादी गोष्ट शिकून आत्मसात करता येते तर तीच गोष्ट प्रयत्न करून विसरताही येऊ शकते याच तत्त्वाला अनुसरून पुनर्सामाजीकरणाची प्रक्रिया शक्य असते.

**उपक्रम – ३**

पुनर्सामाजीकरणासाठी 'Total Institution' ची गरज असते का? असेल तर का? आणि नसेल तर का नाही यावर गटचर्चा आयोजित करा.

सामाजीकरणाच्या निरंतर चालणाऱ्या प्रक्रियेतून मानव प्राणी सुसंस्कृत, समाजशील कसा बनतो ते या पाठातून तुम्ही शिकलात. कुटुंब, शिक्षण, मित्र परिवार, प्रसारमाध्यमे यांचा आपल्या जीवनावर किती प्रभाव असतो ते आपण पाहिले. वेगवेगळ्या वातावरणाशी जुळवून घेताना आपल्याला पुनर्सामाजीकरणाचीही सतत गरज असते हे देखील तुम्हांला समजले असेल आणि आपण तसे केले नाही तर त्याचे काय परिणाम भोगावे लागतील याचीही जाणीव तुम्हाला नक्कीच होईल.

## सारांश

- सामाजीकरण ही एक प्रक्रिया असून त्यात व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित होऊन ती समाजाची कार्यरत सदस्य बनते.
- मानवी वर्तनपद्धती शिकणे ही निरंतर प्रक्रिया असून सामाजीकरणातून आपण वर्तनाचे नियम शिकून सामाजिक समूहाचे कार्यरत सदस्य होतो.
- एका व्यक्तिगत 'स्व' ला सामाजिक ओळख देण्यासाठी सामाजिक आंतरक्रियांची गरज असते.
- समाजाच्या ज्या विविध समूहांमध्ये आणि सामाजिक संबंधांमध्ये सहभागी होऊन व्यक्ती समाजाची सदस्य बनते त्यांनाच सामाजीकरणाची साधने/माध्यमे असे म्हणतात.
- अगदी नवजात अर्भकाच्या सामाजीकरणाची प्रक्रिया जरी कुटुंबात सुरू होत असली तरी कुटुंब हे सामाजीकरणाचे एकमेव साधन नव्हे. विविध सामाजिक समूह आणि संस्थांना सामाजीकरणाची साधने मानले जाते. उदा.शाळा, समवयस्कांचा गट, प्रसारमाध्यमे, शेजार इत्यादी.
- कधी कधी व्यक्तीला नवीन गोष्टी शिकून व जुने सोडून देऊन नवीन परिस्थितीशी आणि पर्यावरणाशी जुळवून घ्यावे लागते. ही जुनी मूल्ये, वर्तनपद्धती, नियमने, भूमिका सोडून देऊन नवीन आत्मसात करण्याच्या प्रक्रियेला पुनर्सामाजीकरण असे म्हणतात.

## स्वाध्याय

**प्र.१(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. ज्या प्रक्रियेतून व्यक्ती समाजातील नियमने शिकते तिला ............ म्हणतात.
(संमीलन, सामाजीकरण, सहकार्यता)

२. कुटुंब सामाजीकरणाचे ............ साधन आहे.
(प्राथमिक, दुय्यम, प्रादेशिक)

३. शाळा हे सामाजीकरणाचे .......... साधन आहे.
(प्राथमिक, दुय्यम, प्रादेशिक)

४. दूरचित्रवाणी हे ........ संपर्काचे माध्यम आहे.
(श्राव्य, दृक्, दृक्-श्राव्य)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

१. (i) भाषा, मूलभूत वर्तन - कुटुंब

(ii) समवयस्कांचा समूह मैत्रीसारखी सामाजिक मूल्ये

(iii) शेजारी - संघभावना, शिस्त

(iv) प्रसार माध्यमे - जनमत तयार करणे

**(क) प्रत्येक विधान वाचा आणि चौकटीत दिलेल्या योग्य संज्ञा ओळखून लिहा.**

| |
|---|
| इंटरनेट, समवयस्कांचा समूह/गट, बाल्यावस्थेतील सामाजीकरण |

१. जीवनाच्या प्रारंभिक अवस्थेत घडून येते.

२. आजच्या काळातील जागतिक प्रभाव

**(ड) अधोरेखित शब्दाच्या जागी अचूक शब्द लिहून विधाने पूर्ण करा.**

१. रेडिओ हे संप्रेषणाचे दृक-श्राव्य माध्यम आहे.

२. समवयस्कांचे समूह हे सत्तावादी साधन आहे.

**प्र.२(अ) दिलेल्या संकल्पनेचे योग्य उदाहरण लिहा व तुमच्या उत्तराचे समर्थन करा.**

१. कुटुंबातील सामाजीकरण

२. पुनर्सामाजीकरण

**(ब) टीपा लिहा.**

१. मीडच्या मते 'स्व'ची निर्मिती

२. सामाजीकरणाची साधने


३. पुनर्सामाजीकरण

**प्र.३ खालील संकल्पना उदाहरणासह स्पष्ट करा.**

१. प्राथमिक सामाजीकरण

२. दुय्यम सामाजीकरण

**प्र.४ (अ) पुढील संकल्पना चित्र पूर्ण करा.**




**(ब) खालील विधाने चूक की बरोबर हे सांगून सकारण स्पष्ट करा.**

१. सामाजीकरण ही आयुष्यभर चालणारी प्रक्रिया आहे.

२. जाहिरातींचा ग्राहकांच्या वर्तनावर परिणाम होतो.

**प्र.५ आपले मत नोंदवा.**

१. 'ब्रेकींग न्यूज' मुळे भीती/धास्ती पसरविणारी प्रतिक्रिया निर्माण होते. हे असे का घडते? यासंबंधी समर्पक उदाहरण देऊन स्पष्ट करा.

२. जरी त्यांच्या घरी ती भाषा वापरली जात नसली तरी अस्वीकाराई भाषेचा बालकांकडून अनेकदा वापर केला जातो, हे कशामुळे घडत असावे? स्पष्ट करा.

**प्र.६ खालील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा. (साधारण १५०-२०० शब्द)**

१. तुम्ही इंटरनेटच्या युगातील पिढीचे प्रतिनिधित्व करत आहात. इंटरनेटमुळे होणाऱ्या सकारात्मक व नकारात्मक परिणामाबद्दल चर्चा करा.

**उपक्रम**

तुमच्या वर्गातील किंवा तुमच्या कोणत्याही ५ समवयस्कांच्या मुलाखती घेऊन ते सर्वसाधारणत: फेसबुक, इंस्टाग्राम, स्नॅपचॅट यासारख्या सामाजिक माध्यमांवर दिवसातला किती वेळ घालवतात, कोणत्या गोष्टी शिकतात, कोणत्या विषयांवर चर्चा करतात, त्याचा त्यांच्यावर काय परिणाम होतो हे शोधा. त्यावर १०० ते १५० शब्दांत अहवाल तयार करा.

***